नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५३ Issue - 153 | वार मंगळवार दि. २१ ऑक्टोबर २०२५ Blow- Tuesday Date 21 October 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सुप्रसिद्ध अभिनेते असरानी यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचं वयाच्या ८४व्या वर्षी निधन झालं असून संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. असरानी यांचं पूर्ण नाव गोवर्धन असरानी असून ते अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होते आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. टीव्ही९च्या रिपोर्टनुसार आज दुपारी ४ वाजता त्यांचे निधन झाले. ५० वर्षांहून अधिक काळ चित्रपटसृष्टीत काम करणाऱ्या काही कलाकारांपैकी असरानी एक होते.

फुफ्फुसांच्या आजारामुळे गेल्या पाच दिवसांपासून असरानी यांना आरोग्य निधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. अभिनेत्याचे मॅनेजर बाबूभाई थिबा यांनी असरानी यांच्या मृत्यूची बातमी सांगितली आणि म्हणाले की, असरानी अनेक दिवसांपासून आजारी होते आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

असरानी यांच्या अकाली निधनानं चाहते आणि कलाकारांनाही धक्का बसला आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक चित्रपटांमध्ये काम केलंय. असरानी यांचा जन्म १ जानेवारी १९४१ रोजी जयपूर येथे झाला. त्यांनी जयपूरमधील सेंट झेवियर्स स्कूलमध्ये शिक्षण घेतलं आणि नंतर राजस्थान कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. १९६७ मध्ये 'हरे कांच की चुडियाँ' या चित्रपटाद्वारे असरानी यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिलं नाही. असरानींच्या सर्वात संस्मरणीय भूमिकांपैकी, 'शोले' चित्रपटातील जेलरची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या चित्रपटातील त्यांचा डायलॉग, 'हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं' खूप प्रसिद्ध झाला आणि दशकांनंतरही लोक अजूनही या डायलॉगसाठी असरानींना ओळखतात.

१९७३ मध्ये असरानी यांनी मंजू बन्सलशी लग्न केलं. असरानी यांना एक मुलगा असून त्याचं नाव नवीन असरानी आहे. त्यांचा मुलगा अहमदाबादमध्ये डेन्टिस्ट आहे. असरानी यांचे वडील कार्पेटचं दुकान चालवायचे. त्यांना तीन भाऊ आणि चार बहिणी होत्या.

दरम्यान, असरानी यांच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यांनी 'धमाल', 'ढोल', 'बालिका वधू', 'हेरा फेरी', 'मालामाल विकली', 'हेरा फेरी ३' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# स्वदेशी आयएनएस विक्रांत भारताच्या सैन्य क्षमतेचे प्रतिबिंब

## नौदलाच्या जवानांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साजरी केली दिवाळी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोवा : पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नौदलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली. गोव्यात आयएनएस विक्रांतवर त्यांनी जवानांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नौदलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली. नरेंद्र मोदींनी यावेळी आयएनएस विक्रांतला देखील भेट दिली.

गोव्यात खछड विक्रांतवर त्यांनी जवानांशी संवाद साधला. आत्मनिर्भर भारत आणि मेड इन इंडियाच खछड विक्रांत सर्वात मोठं प्रतीक असल्याचं नरेंद्र मोदींनी सांगितलं. स्वदेशी आयएनएस विक्रांत भारताच्या सैन्य क्षमतेचे प्रतिबिंब आहे, असं नरेंद्र मोदींनी सांगितलं. नरेंद्र मोदींनी नौसैनिकांसह त्यांच्या कुटुंबीयांना देखील दिवाळीच्या शुभेच्छा दिल्यात.

नरेंद्र मोदींनी सर्व नौसैनिकांना मिठाई भरवत दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्यात. तुमच्या माध्यमातून मी कुटुंबासोबत दिवाळी साजरी करतोय, असं नरेंद्र मोदी म्हणाले. यावेळी सैनिकांनी देशभक्तिपर गाणी देखील गायली. आयएनएस विक्रांतची कामगिरी सांगत नरेंद्र मोदींनी पाकिस्तानवर चांगलाच हल्लाबोल केला.

## 'देशावर संकट आल्यावर मोठे लोक माझं नाव घेतात'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : चिकाटी सोडू नका, कष्ट करायची ताकद ठेवा. कोणतंही संकट आलं तरी चिंता करू नका. काही प्रश्न आला तर त्याची सोडवणूक करू मात्र काम नीट करा. कष्टाने करा, लोकांनी म्हटलं पाहिजे की काम द्यायचं असेल तर बारामतीच्या मुलांना देण आवश्यक आहे. हा संदेश देशात गेला पाहिजे. देशाला संकट आलं तर मोठी मोठी लोक शरद पवारांचं नाव घेतात. त्यामुळे तुम्ही काही काळजी करू नका, असे मोठे विधान ज्येष्ठ नेते शरद पवारांनी बारामतीत आज केले.

शरद पवार हे मागील चार दिवसांपासून बारामती दौऱ्यावर आहेत. सोमवारी पवारांच्या उपस्थितीत एक खाजगी कार्यक्रम पार पडला.यावेळी पवार होते. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, पहिल्यांदा जेव्हा जनतेने मला राज्य सरकारमध्ये काम करण्याची संधी दिली. तेव्हा पहिला निर्णय मी असा घेतला की, बारामतीत एमआयडीसी काढायची. दुधावर प्रक्रिया करणारी डायनामिक्स सारखी कंपनी आणायची. या कामासाठी काही लोकांनी खूप सहकार्य केलं.

त्यामध्ये रुई, सावळ, वंजारवाडी येथील शेतकऱ्यांना विचारले की मला इथे कंपनी आणायची आहे. तुम्ही मला जागा द्याल का. त्यावेळी शेतकऱ्यांनी दोन्ही हात वर करून संमती दिली. आणि त्यानंतर उद्योगाचे केंद्र म्हणून बारामतीकडे पाहिलं जाऊ लागलं. पुढे शिक्षणाच्या सोयी केल्या. याचा परिणाम असा झाला की, विविध राज्यात मी ज्यावेळेस फिरतो तेव्हा अनेक मुलं मुली सांगतात की मी बारामतीत शिक्षण घेतल आहे. बारामती तालुक्यातील वंजारवाडी येथे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवारांनी अनेक वर्षानंतर भेट दिली. भेटी दरम्यान त्यांनी गावातील युवकांच्या रोजगारां संदर्भात माहिती जाणून घेतली. ग्रामस्थांनी रोजगार संदर्भात असणाऱ्या विविध समस्या शरद पवारांसमोर मांडल्या. ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत, त्या समस्या सोडवण्याचे आश्वासन पवार यांनी यावेळी दिले. स्थानिक युवकांना बारामती, एमआयडीसीत अनेक कंपन्यांमध्ये स्थान दिले जात नाही.

स्थानिक असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो. त्यांना डावलले जाते. या समस्या शरद पवारांनी जाणून घेतल्या. तसेच नव्या पिढीला रोजगार मिळवून देण्यासाठी तयारी दाखवली. असल्याची माहिती वंजारवाडीचे सरपंच जगन्नाथ वनवे यांनी दिली.

## महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' विकसित भारताचे स्वप्न साकारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात म्हणजे २०४७ मध्ये विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे. या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विकसित महाराष्ट्र २०४७ सल्लागार समितीच्या बैठकीत व्यक्त केला.

या बैठकीत विकसित महाराष्ट्र २०४७ मसुद्याला सल्लागार समितीने मान्यता दिली. हा मसुदा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी लवकरच मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. या मसुद्यात २०२९, २०३५ आणि २०४७ पर्यंत अशा तीन टप्प्यातील विकसित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्याचा ' रोडमॅप ' दिला आहे.

### विकसित महाराष्ट्र २०४७ मसुदा सल्लागार समितीची बैठक संपन्न



बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे उपस्थित होते, तर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकसित महाराष्ट्राचा मसुदा हा ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. (पान २ वर...)

महसूलमंत्र्यांकडून दिवाळी भेट

४७ अधिकाऱ्यांना बढत्या

# महाराष्ट्राला मिळाले ४७ नवे अपर जिल्हाधिकारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या महसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत. तब्बल गेल्या १० वर्षांपासून अधिकाऱ्यांच्या बढत्या रखडल्या होत्या. ऐन दिवाळीच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारकडून आज शासन आदेश जारी करत अधिकाऱ्यांना दिवाळी भेट देण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल अधिकाऱ्यांना पदोन्नतीची दिवाळी भेट दिली आहे. तत्पूर्वी आज मंत्रालयातील दालनात जाऊन बावनकुळे यांनी राज्यातील सर्वच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरेन्सिंगद्वारे संवाद साधला.

देशभरात दिवाळीचा उत्साह असून कामगार, कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनसही मिळाला आहे, तर अद्यापही काहींना दिवाळी भेटवस्तू दिल्या जात आहेत. आता, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूलमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिवाळी भेट दिली आहे. हसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत.

सामान्य प्रशासन १५ ऑक्टोबर रोजीच्या इतिवृत्तान्वये, आस्थापना मंडळ (क्रमांक २) यांनी अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदोन्नतीच्या पदाची पात्रपात्रता तपासून निवडसूची वर्ष २०२५-२६ मध्ये अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-१ ७८,८००- २,०९,२००/-) या संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस २७-११,२३,१००-२- ,१५,९००/-) या संवर्गात नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे, असे शासन आदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ (६) (३) मधील तरतुदनुसार पदोन्नत अधिकारी ३० दिवसांचे आत रूजू न झाल्यास सदरचे अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील. १५. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू झाल्याबाबतचा अहवाल ीर्शींशर्पीशारहरीरिहींीर.सेीं.ळप या ई-मेलव्दारे/टपालाव्दारे शासनास त्वरीत कळवावे, असेही आदेशात म्हटले आहे.



महसूल विभाग जनतेच्या आशा, आकांक्षांना मूर्तरूप देणारा विभाग आहे. हा विभाग अधिकाधिक जनताभिमुख व्हावा. पारदर्शी रहावा, यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू. सर्वसामान्य जनतेशी थेट संबंध येणाऱ्या मोजक्या शासकीय विभागांपैकी आपला हा विभाग महत्वाचा घटक आहे. तो अधिक बळकट व्हावा, कार्यक्षम व्हावा आणि त्यातून राज्याची प्रगती उत्तरोत्तर व्हावी, असा संकल्प आपण सारे मिळून दीपपर्वाच्यानिमित्ताने करूया, असे म्हणत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयातील सहकाऱ्यांसमवेतचा फोटो शेअर केला आहे.

मंत्रालयातील दालनातून राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच नोंदणी व मुद्रांक विभागातील नोंदणी महानिरीक्षक ते दुय्यम निबंधकपदावरील सर्व अधिकारी व भूमीअभिलेख विभागातील जमाबंदी आयुक्त ते भूमिअभिलेख उपअधीक्षक अशा सुमारे एक हजार सहाशेवर अधिकारी कर्मचाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे मंत्री बावनकुळे यांनी आज सकाळी संवाद साधला. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे व मंत्रालयातील अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला जीआरचा फायदा होणार नाही : बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारची भूमिका ठाम असून, कोणाच्याही ताटातील वाटा काढून दुसऱ्याला दिला जाणार नाही, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिली.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून तीन प्रमुख नेत्यांमध्ये वेगवेगळी मते असल्याचे निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले, २ सप्टेंबरचा शासन निर्णय न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, त्यावर अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही. मात्र, हैद्राबाद गँझेटियर हे मराठवाडा आणि विदर्भ या भागापुरतेच लागू असून पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला त्याचा फायदा होणार नाही. त्यामुळे, ओबीसी नेत्यांनी गैरसमज करुन घेऊ नये, असेही ओबीसी उपसमितीचे प्रमुख असलेल्या बावनकुळे यांनी स्पष्ट केले.



सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा आणि ओबीसी समाज आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. ओबीसी नेत्यांनी २ सप्टेंबरचा शासन आदेश हा ओबीसींच्या आरक्षणावर घाला घालणारा असल्याचं म्हटलं. त्याच, अनुषंगाने बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार मेळावा देखील संपन्न झाला. तर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून मनातील खंत आक्रमक व भावनिकपणे बोलून दाखवली. आता, यासंदर्भात बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी, कोणच्याही ताटातील दुसऱ्या कोणाला दिले जाणार नाही याबाबत नेत्यांनी खात्री बाळगावी, असे म्हटलं आहे.

महसूलमंत्र्यांनी नागपूरच्या विकासासंदर्भात मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीची माहिती दिली. ते म्हणाले, नागपूर ग्रामीण, एनएमआरडीए आणि नागपूर शहराच्या विकासाकरता आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत मोठे आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सहजतेने पोहोचावा, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे नागपूर परिसरातील विकासकामांना मोठी गती मिळेल, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय....

### नाराजीचा सूर

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महायुतीतच धुसफूस पाहायला मिळत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये निवडणूकांच्या पार्श्वभूमिवर युतीबाबत शिवसेनेत काहीसा विरोध पहायला मिळतोय. स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून जिल्हा स्तरावरील आढावा बैठकांमधून हा विरोध प्रामुख्याने पाहायला मिळाला. बैठकांमध्ये भाजपकडून होणारा त्रासामुळे युतीबाबत शिवसेनेतील नेत्यांमध्ये मतमतांतर पाहायला मिळतायत. अनेक ठिकाणी भाजप नेत्यांकडून डिवचण्याचे प्रकार सुरू असल्याने शिवसैनिकांकडूनही स्वबळाचा नारा आता जोर धरू लागला आहे. जिल्हानिहाय बैठकांमधील अहवालानंतर युती संदर्भात निर्णय मुख्यनेत्यांच्या सूचनेनंतर होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. ठाणे हा एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला असताना इथे मंत्री गणेश नाईक आणि संजय केळकर यांनी परस्पर स्वबळाचा नारा देत शिंदेंना डिवचले आहे. त्यावरून शिवसेनेच्या पदाधिकार्यांमध्ये नाराजीचं वातावरणं आहे. भाजप नेत्यांच्या या भूमिकेमुळे शिवसेनेही स्वबळाची तयारी सुरू केली आहे नवी मुंबई महानगर पालिकेवर गणेश नाईक याचं वरदहस्त आहे. मात्र शिंदेबाबत केलेल्या वक्तव्यावरून नवी मुंबईत भाजप विरूद्ध शिंदेंच्या शिवसेनेचे संबध टोकाचे ताणले गेल्याने इथेही दोन्ही पक्षांनी स्वतंत्र तयारी सुरू केली आहे कल्याण-डोंबिवली या नगरपालिकेत गणपत गायकवाड यांनी केलेल्या गोळीबारानंतर भाजप आणि शिवसेनतील संबध टोकाचे ताणले गेलेले अशातच भाजप प्रदेशाध्यक्षाकडून शिवसेने विरोधात पाऊले उचलून अप्रत्यक्ष प्रतिस्पर्धींना मदत केली जात असून इथेही भाजपकडून स्वबळाचा नारा दिली जात असल्याने इथेही युतीची शक्यता धुसर आहे मिरा-भाईंदर या नगरपालिकेवर भाजपचं वर्चस्व आहे. त्यामुळे इथेही भाजपकडून शिंदेंच्या शिवसेनेला झुकतं मापं दिलं जातं, यातच यंदा पालिकेची जबाबदारी मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर जबाबदारी देणयात आली असून इथेही भाजपकडून स्वबळाची तयारी सुरू केल्याने शिवसेनेकडूनही आता स्वतंत्र प्रयत्न सुरू केले आहेत उल्हासनगर शहरातही काही दिवसांपूर्वी भाजपने शहरातील समस्यांवर आक्रमक भूमिका घेतली होती. त्यावरून युतीतील संबध ताणले गेले आहेत. येथील स्थानिक आमदार कुमार आयलानी यांनी थेट पालिका आयुक्तांना आंदोलनाचा इशारा दिला होता. येथेही शिवसेनेची सत्ता होती. तर येथे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा वरचष्मा आहे अंबरनाथ शहरातील नागरी समस्यांवरून भाजपने पालिका प्रशासनाला कोंडीत धरण्यास सुरूवात केली आहे. अभिजीत करंजुले यांच्या माध्यमातून पालिका क्षेत्रातील पथदिवे, रस्ते आणि इतर समस्यांवरून पालिकेचा टाळे ठोकण्याचा इशाराच दिला आहे. येथेही पालिकेत शिवसेनेचे वर्चस्व असून अप्रत्यक्षपणे शिवसेनेलाच कोंडीत पकडण्याचा हा प्रयत्न सुरू असल्याने भाजप विरूद्ध शिवसेना जुंपली आहे बदलापूर शहरात भाजपचे आमदार किसन कथोरे आणि शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्यातील वाद तीव्र होत असल्याची चर्चा आहे. आमदार कथोरे यांनी थेट पालिकेतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्याचा इशाराच अधिकार्यांना दिला आहे. चौकाचौकात पालिकेच्या गैरकारभाराचे पुरावे देणार असे सांगत कथोरे यांनी थेट पालिकेवर वर्चस्व असलेल्या शिवसेनेलाच आव्हान दिले आहे. सांगलीत खानापूर तालुक्यातील शिवसेनेचे आमदार सुहास बाबर याच्या विरोधात राष्ट्रवादीतून लढलेले वैभव पाटील यांना भाजपने प्रवेश दिल्याने नाराजी साताऱ्यात मंत्री शंभूराज देसाई यांच्या विरोधात लढलेले सत्यजित सिंह पाटणकर यांना भाजपने पक्षात प्रवेश दिला. कित्येक वर्ष या दोन घराण्यांचा संघर्ष सुरू असताना भाजपने प्रवेश दिल्याने नाराजी मंत्री भरत गोगवले यांच्या विरोधात उबाठाकडून विधानसभा लढवलेल्या स्नेहल जगताप यांना राष्ट्रवादीत प्रवेश दिल्याने शिवसेना विरूद्ध राष्ट्रवादी हा संघर्ष आहे. रायगडमधील शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात राष्ट्रवादीतून बंडखोरी करत अपक्ष उभे राहिलेल्या सुधाकर घारेंना प्रवेश दिल्याने राष्ट्रवादी विरूद्ध शिवसेना हा संघर्ष शिगेला पेटला आहे. नाशिकमध्ये राष्ट्रवादी शिवसेना आणि भाजप या तीनही पक्षात आपसी शितयुद्ध उघड आहे. भुजबळ आणि सुहास कांदे यांच्यातील वाद तर आहेच, भाजपकडून पालिकेत शंभरपेक्षा जास्त जागा जिंकण्याचे आवाहन केले जात असल्याने युतीच्या भरोस्यावर राहणे युतीचे असल्याचे मत बैठकित शिवसेना पदाधिकारयांनी मांडले; शिवसेनेचे पाचोरा विधानसभेचे आमदार किशोर आप्पा पाटील यांचे प्रतिस्पर्धी वैशाली सुर्यंवशी यांना भाजपने प्रवेश दिला. नुसता प्रवेश न देता निधीही दिला जात असल्याने किशोर आप्पांनी उघडपणे युती होणार नसल्याचे म्हटले आहे. भाजप आम्हाला संपवायला निघाला असल्याची भावनाही बोलून दाखवली आहे. धुळ्यात भाजपचे आमदार अमरिश पटेल यांची एकहाती सत्ता आहे.

# अतिवृष्टी शेतकऱ्यांची भरपाई कर्जात वळवल्यास कडक कारवाई: मंगळवेढा तहसीलदार बँकांना दिले आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अतिवृष्टी शेतकऱ्यांची भरपाई कर्जात वळवल्यास कडक कारवाई मंगळवेढा तहसीलदार बँकांना दिले आदेश. तहसीलदार मदन जाधव यांना महसूल विभागातील क्षेत्रीय स्तरावरील उत्कृष्ट अधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर. सोलापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासन स्तरावरून आदेश निघर्व मित करण्यात आले आहेत. त्यानुसार नियमानुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई करण्याची कारवाई सुरू झाली



आहे.

तरी संबंधित बँकांनी नुकसान भरपाईची रक्कम कर्ज खात्यात रक्कम जमा करून घेऊ नये. अन्यथा फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येईल, इशारा तहसीलदार कार्यालयाकडून बँकांना देण्यात आला आहे.

अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेती पिके व बहुवार्षिक पिकाचे नुकसान झालेले आहे त्यामुळे राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना बँक खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्याची सुरुवात केली आहे. त्या रकमेतून काही बँकांकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम वसूल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंगळा तालुक्यातील अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेती पिकांचे व बहुवार्षिक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भरपाईच्या मतीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात त्या रकमेतून कोणत्याही प्रकारचे वसुली होणार नाही, याबाबत बँकांना सूचना द्याव्यात. तसेच शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करताना मतीच्या रकमेतून वसुली केळीचे आढळल्यास बँकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार मदन जाधव यांनी दिला आहे. लेखी आवाज जिल्हाधिकाऱ्याकडे सादर मंगळवेढा तहसीलदार यांनी व्यवस्थापक अग्रणी बँक तालुका मंगळवेढा यांना शेती पिकाच्या अनुदान रकमेतून वसुली न करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे तशी लेखी अहवाल जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना माहिती स्तव देण्यात आला आहे.

तसेच प्रत्येक सर्व मंडळ अधिकारी व ग्राम मसूर अधिकारी यांनाही याबाबत माहिती देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या मदतीची रक्कम बँकांनी कर्जात मोडून घेतल्याचे निदर्शना झाल्यात तात्काळ तलाठी सर्कल यांच्याशी संपर्क साधण्याची आव्हान करण्यात आले आहे.

# घाटकोपर पूर्वेत 'सिद्धकला विश्वस्त मंडळा'तर्फे 'बालसंस्कार केंद्र'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज

घाटकोपर पूर्वेतील पंतनगर येथे 'सिद्धकला विश्वस्त मंडळा'तर्फे इमारत क्रमांक १०५ च्या शेजारी 'बालसंस्कार केंद्रा'चे उद्घाटन माजी खा. मनोज कोटक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विशेष अतिथी म्हणून घाटकोपरचे आ. पराग शहा उपस्थित होते.




या कार्यक्रमाला, भाजप महामंत्री संजय दरेकर ( बाबू ), भाईंदर शाखा सेवा प्रमुख भालचंद्र शिरसाट, प्रदीप सावंत, संदीप कुलथे, गीता अविनाश जाधव, ईशान्य मुंबई भाजप महामंत्री विकास कामत, राजा मुसळे, ईशान्य मुंबई भाजप उपाध्यक्ष रवी कुंज, मंडळमंत्री गजानन पवार, मुंबई महिला भाजपमंत्री अनिता अतितकर, मुंबई भाजप सचिव अशोक राय, राकेश साबळे यांसह 'सिद्धकला विश्वस्त मंडळा'चे पदाधिकारी, भक्तगण आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी खासदार मनोज कोटक म्हणाले, समाजाला अशा केंद्रांची गरज ओळखून आपण जास्तीत जास्त 'बालसंस्कार केंद्र' स्थापन केली पाहिजेत, तरच भविष्यात चांगले नागरिक देशात निर्माण होतील. तुम्हा सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेऊन माझ्याकडून पाठपुराव्याने हे काम करून घेतले म्हणून शक्य झाले. माझ्या कारकिर्दीतील हे तिसरे बालसंस्कार केंद्र आहे, जे पूर्णत्वास गेले. यामागे कलावती आई यांचा आशीर्वाद आणि आपण सर्व करीत असलेले अखंड नामस्मरण आहे. जो योग्य कर्म करतो त्यालाच मुक्ती मिळते. त्यामुळे कर्मावर विश्वास ठेऊन कार्य करत राहा, असेही त्यांनी सांगितले. आ. पराग शहा म्हणाले की, मनोज कोटक यांनी ज्या ज्यावेळी एखादे काम हाती घेतले, त्या त्यावेळी ते पूर्णत्वास नेले. आपली सर्वांची अध्यात्मात शक्ती आहे म्हणूनच हे शक्य झाले. लोकांची कामे करणे ही आमची जबाबदारी आहे. ती आम्ही सातत्याने पार पाडू, असेही त्यांनी सांगितले. संजय दरेकर आणि भालचंद्र शिरसाट यांनी बालसंस्कार केंद्र' व्हावे यासाठी सातत्याने मनोज कोटक आणि आमदार पराग शहा यांच्याकडे प्रयत्न केला त्याला दोघांनी प्रतिसाद देत म्हणून बालसंस्कार केंद्राचे काम पूर्णत्वास नेल्याचे संजय दरेकर ( बाबू ) यांनी सांगितले.

# साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे दिवाळी पहाट जल्लोषात साजरी

**ख्यातनाम गायिका उत्तरा केळकर, सोनाली कर्णिक, दत्ता मदन, दत्तात्रय मेस्त्री, अभिषेक नलावडे, धनश्री देशपांडे यांची संगीतमय कार्यक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने रसिकांची दिवाळी स्वर संगीताने उजळवण्यात आली. यावेळी गाजलेल्या चित्रपट गीतांचा व भावगीतांचा बहारदार दिवाळी पहाट कार्यक्रम साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे आयोजित करण्यात आला. या प्रसंगी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मराठी संस्कृती जपणारे सांस्कृतिक कार्यक्रम करणार असल्याचे प्रतिपादन केले.

यांप्रसंगी ख्यातनाम गायिका उत्तरा केळकर यांचा सत्कार करण्यात आला. साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे रंगलेल्या या कार्यक्रमात गाजलेल्या चित्रपट गीतांचा व भावगीतांचा कार्यक्रम ख्यातनाम गायिका उत्तरा केळकर, सोनाली कर्णिक, दत्ता मदन, दत्तात्रय मेस्त्री, अभिषेक नलावडे, धनश्री देशपांडे, संगीत संयोजन अमित गोठीवरेकर तर निवेदन अमित काकडे यांनी केले.

ज्येष्ठ दिग्दर्शक, अभिनेता गुरुदत्त म्हणजे मानवी मनाचे कांगोरे हाताळणारे दिग्दर्शक – मंत्री ड. आशिष शेलार

गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाची सांगितिक मानवंदना मुंबई : मानवी मनाचे कांगोरे हाताळणारे दिग्दर्शक म्हणून अभिनेता गुरुदत्त यांची ओळख होती, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर



पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी केले.

संवेदनशील अभिनेते आणि दिग्दर्शक गुरुदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाने मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले, मुंबई येथे आज एका सांगितिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते किशोर कदम व नाट्यनिर्माते प्रसाद कांबळी हजर होते.

या कार्यक्रमात ख्यातनाम गायक गायिका सरिता राजेश, सौम्या वर्मा, सर्वेश मिश्रा, ओंकार देवासकर, अमित काकडे, रिधीमा लाड इ. कलाकार सहभागी होते. रसिक प्रेक्षकांनी या सांगितिक कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला.

# महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' विकसित भारताचे स्वप्न साकारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..)

भविष्यात कुठलीही योजना, धोरणे बनविताना या मसुद्याचा उपयोग झाला पाहिजे. हे ' डॉक्युमेंट' महाराष्ट्राला राज्यांसोबत नाही, तर जगासोबत स्पर्धा करण्यास सक्षम बनवेल. या संपूर्ण मसुद्याचे व्हिडिओ स्वरुपामध्येही रूपांतर करण्यात यावे. ज्यातून नागरिकांना सुलभ पद्धतीने तो समजून घेता येईल.

यंत्रणांनी यापुढे मंजुरीसाठी येणाऱ्या प्रस्तावांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे प्रस्ताव स्वीकारण्याची यंत्रणा निर्माण करावी. प्रस्तावात उणिवा असल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा, यातून वेळेची फार मोठी बचत होईल, अशी ही यंत्रणा असावी. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रभावी काम करण्यासाठी एलएलएम (लार्ज लैंग्वेज मॉडेल) तयार करावे. उद्योग विभागाने भागीदारीतून विविध योजनांच्या लाभार्थी माहितीसाठी 'क्लाऊड कम्प्युटिंग' वर आधारित व्यवस्था उभारावी. त्याचा उपयोग सर्व यंत्रणांना होईल. राज्याला पुढे नेत असताना भविष्यात कुठलीही अडचण न येणारे शाश्वत विकासाचेच मॉडेल निर्माण करावे, असे आदेशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

हा मसुदा बनविण्यासाठी नागरिकांनी दिलेल्या सूचनांबद्दल मुख्यमंत्र्यांनी आभार व्यक्त करीत नागरिक राज्याच्या विकासाप्रती किती सजग आहे, हे यावरून दिसून येत असल्याचे सांगितले.

बैठकीस मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (नगरविकास) असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अपर मुख्य सचिव (कृषी) विकासचंद्र रस्तोगी आदींसह विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

विकसित महाराष्ट्रासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या मसुद्यासाठी राज्यात १९ जून २०२५ ते २८ जुलै २०२५ पर्यंत सर्व्हे करण्यात आला. यामध्ये राज्यभरातून चार लाख नागरिकांचा प्रतिसाद प्राप्त झाला. या प्रतिसादांमध्ये ३५ हजार 'ऑडिओ मेसेज' चा समावेश होता. तसेच विकासाच्या सूचनांचा जास्त अंतर्भाव होता. त्याचप्रमाणे विविध विभागांच्या विशिष्ट सर्व्हेमध्ये सात लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला.

# खरोशाचे सुपुत्र अजय राजेंद्र साळुंके- शेतकऱ्याचा मुलगा ते राजकारणातला कोहीनुर, आता खरोसा गटातून जिल्हा परिषदेसाठी भाजपचा बुलंद आवाज!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव :

औसा तालुक्यातील खरोसा ही माती कर्मभूमी आणि संस्कारांचे पाळणाघर. या भूमीने अनेक समाज-सेवक घडवले, पण आज या भूमीचा खरा अभिमान बनले आहेत श्री अजय राजेंद्र साळुंके – एक सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा, ज्यांनी संघर्षातून वाट काढत गेल्या विस वर्षापासुन राजकीय जिवनात खरोसा सरपंच व भाजपचे अनेक पदे भुषवत राजकारणात आपला ठसा उमटवला आणि आता पुन्हा आपल्या मातृभूमीच्या विकासासाठी २०% राजकारण व ८०% समाजकारण करण्यासाठी राजकीय क्षेत्रात असुन खरोसा जिल्हा



परीषद सर्कल गटातुन निवडणुकीसाठी ईच्छुक असुन .

खरोसा गावच्या विकासात आपल अनमोल योगदान देत सर्वसामान्य लोकांची सेवा हेच ब्रिदवाक्य डोळ्यासमोर ठेउन . त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेने जिल्हा परीषद खरोसा सर्कल च्या लोकांची सेवा करण्यासाठी सज्ज असुन ..

अजय साळुंके यांनी राजकीय प्रवासात गेल्या विस ते पंचविस वर्षात गावातील विकासकामे करत असताना तालुक्या आमदार अभिमन्यु पवार यांच्या निधीतुन खरोशासाठी अनेक लोकहिताचे विकासकामे करुन एक आदर्शवत कार्य केल्याने व साळुंके यांनी खरोशात विकासाचे पर्व राबवत केलेली विकासकामे व लोकांची सेवा याच फलित मनुन येणार्या काळात आ.अभिमन्यु पवार साहेबांच्या नेतृत्वात खरोसा जिल्हा परीषद गटातील जनतेची सेवा करण्याचा संकल्प केला असुन ,

विकासात्मक कामे करत असताना समाजात श्रद्धा, ऐक्य आणि संस्कृतीची ज्योत प्रज्वलित केली आहे. हा उपक्रम आज खरोसा गटातील समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

राजकीय जिवनात सामाजिक कार्यासोबतच भारतीय जनता पक्षाशी त्यांनी अनेक वर्षांपासून निष्ठा ठेवली आहे. पक्षाच्या विचारधारेवर त्यांचा ठाम विश्वास असून, सर्वसामान्य माणसासाठीचं राजकारण ही त्यांची जीवनभूमिका आहे. त्यामुळे ते नेहमीच लोकांच्या मनात विशेष स्थान मिळवतात.

खरोसा ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून साळुंके यांनी गावात रस्ते, पाणी, शिक्षण, शेतीसंबंधी सुविधा आणि रोजगारनिर्मितीव भर देत खरोशाच्या विकासात मोलाच योगदान दिल असुन आमदार अभिमन्यु पवार यांच्या संकल्पनेतील प्रत्येक शेतकर्यांच्या हितासाठी व सोयीसाठी खरोसा येथे अजय साळुंके सरपंच असताना १४ किलोमीटर क्षेत्रातील शेतरस्त्याचे कामे करुन तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे .खरोसा येथील रेणुका नगर सारख्या दुर्गम भागासाठी आ.पवार साहेबांना विनंती करुन अजय साळुंके यांच्या विशेष प्रयत्नातुन पर्यटन विकासातही सिंहाचा वाटा आहे .भारतीय जनता पक्षात काम करत असताना संघटणात्मक बांधनी करत पक्षसंघटण मजबुत करत भाजप किसान मोर्चात काम करत असताना शेतकरी हितासाठी व शेतकर्यांच्या न्यायहक्कासाठी अनेक आंदोलन व रास्ता रोको करुन सर्वसामान्यांना न्याय हक्कासाठी भरीव योगदान अजय साळुंके यांनी दील आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या जिल्हा परिषद आरक्षणानुसार खरोसा गट सर्वसाधारण झाल्याने आता या गटातून भारतीय जनता पक्षाकडून अजय साळुंके हे प्रबळ इच्छुक म्हणून चर्चेत आले आहेत. ग्रामविकास, शिक्षण, शेतकरी हित आणि युवकांना संधी देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली आहे.

**लोकांमध्ये एकच चर्चा सुरू आहे –**

खरोसा गटाचा खरा विकास करायचा असेल, तर तो फक्त अजय साळुंके यांच्या नेतृत्वाखालीच शक्य आहे!

जनतेचा विश्वास, पक्षाचे आशीर्वाद आणि विकासाची दृष्टी – या तिन्हीचा संगम म्हणजे अजय साळुंके

भारतीय जनता पक्षाच्या संस्क्रतीत –

विकासाच्या नव्या युगाची सुरुवात खरोसा गटातून!

या निर्धाराने अजय राजेंद्र साळुंके आता जनतेच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आशा वर्कर छेडछाड प्रकरणी महिलांचा संघटनेच्या वतीने निफाड पोलीस स्टेशनला मोर्चा

## निफाड पोलिस स्टेशनवर काढला मोर्चा; पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आयटक महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अशा व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने नुकत्याच झालेल्या आशा वर्कर छेडछाड प्रकरणी पीडित महिलेस न्याय मिळावा व १०२ रुग्णवाहिका चालकास कठोर शिक्षा व्हावी यासाठी निफाड पोलीस स्टेशन येथे मोर्चाद्वारे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनानिवेदन देण्यात आले आहे.



निवेदनात पुढे म्हटले आहे की पीडित आशा वर्कर महिला या अनेक वर्षापासून आपल्या कार्यक्षेत्रात आरोग्य सेविका म्हणून काम करतात सरकारी आरोग्य यंत्रणेतील सर्वात खालच्या पातळीवर काम करणाऱ्या आशा वर्कर महिला आपल्या समाजाच्या आरोग्य रक्षक आहेत जनतेच्या आरोग्यासाठी त्या रात्रंदिवस झटत असतात परंतु आरोग्य सेविकांच्या सन्मानावर सुरक्षिततेवर वार करणारी ही घटना असून राज्याच्या आरोग्य यंत्रणेच्या सुरक्षितता व नैतिक जबाबदारीवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे, असे निवेदनात म्हटले असून, १०२ गाडी चालकास तात्काळ निलंबित करावे , पीडित अशा वर्कर महिलेला शासनाकडून संरक्षण मिळावे व वैद्यकीय सेवा आर्थिक मदत व्हावी ,तसेच आशा वर्कर व महिला कर्मचाऱ्यांच्या प्रवासासाठी सुरक्षेचे मार्गदर्शक तत्वे तयार करून अमलात आणावे रात्रीच्या वेळी प्रवासात महिला कर्मचाऱ्यांसोबत महिला साथीदार असावी, गाडीमध्ये सीसीटीव्ही व जीपीएस प्रणाली कार्यरत असावी अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहे.

> **निफाड तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रामध्ये काम करणाऱ्या आशाताई यांचे वरती १०२ वाहन चालक यांने जो विनयभंग केला त्याचे वरती कठोर कारवाई व्हावी, आशाताईंना रात्री अप रात्री रुग्णांना घेऊन रुग्णालयात जावे लागते त्यांना सामाजिक सुरक्षा मिळावी, गुन्हेगारास कडकशासन व्हावे. कोरोना योध्या आशा गट प्रवर्तक ना सन्मानाची वागणूक द्या.**
>
> **– राजू देसले, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा गट प्रवर्तक संघटना आयटक**

> **१०२ चा वाहन चालक गुडघे याला कामावरून कमी करावे ही मागणी आयटक महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अशा गटप्रवर्तक संघटनेने केली होती त्यानुसार त्याला कामावरून कमी करण्यात आले आहे.**
>
> **– वैद्यकीय अधिकारी निमगाव वाकडा**

झालेल्या घटनेची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी अन्यथा महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अशा गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल असा कडक इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे



याप्रसंगी राज्य अध्यक्ष कॉम्रेड राजू देसले जिल्हाध्यक्ष सुरेखा खैरनार आयटक संघटक प्राजक्ता कापडणे मनीषा खैरनार रोहिणी मुदगल रूपाली सानप , वैशाली कवडे, आदी आशा वर्कर महिला पदाधिकाऱ्यांच्या साह्या आहेत

# खुदावाडी पंचायत समिती गणातून महायुतीकडून किशोर सुरवसे तर महाविकास आघाडी कडून पद्माकर पाटील इच्छुक





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गटांतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातून भाजपा व मित्रपक्षाच्या महायुतीकडून वागदरी ता. तुळजापूर येथील भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते किशोर लक्ष्मण सुरवसे हे निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत तर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार )व शिवसेना (उबाठा ) महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार ) पक्षाचे येडोळा ग्रा.प. चे माजी सरपंच पद्माकर मधुकर पाटील हे संपूर्ण ताकतीनिशी निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत.

महायूतीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले वागदरी ता.तुळजापूर येथील किशोर सुरवसे हे तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते असून सन २०२४ ला आमदार राणा दादा यांच्या मार्गदर्शनाखाली गावात आरोग्य शिबीराचे आयोजन केले होते.या शिबिरात ८५ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. केंद्रसरकार व राज्य साकार यांच्या कडून राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनेचा सामान्य जनतेला लाभ मिळवून देण्यासाठी सतत प्रयात्नशिल असतात गावातील जवळपास १०० लाडक्या बहिणींचे फार्म स्वतः चा मोबाईलवर विनामूल भरून त्याना या योजनेचा लाभ मिळवून दिला. शेतकऱ्यांसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी उदाहरणार्थ पीक विमा असेल अनुदान असेल किंवा वैयक्तिक लाभाच्या योजना असतील त्या मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात ज्येष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन त्यांचे फॉर्म भरून घेतले. भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी प्रकियेत सक्रिय सहभाग घेऊन खुदावाडी पंचायत समिती गणात प्रत्येकाच्या घरी जाऊन सर्वाधिक सदस्य नोंदणी केली. शासनाच्या सर्व योजनांची माहिती प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम ते जाणीवपूर्वक करतात महायुतीच्या माध्यमातून भाजपाच्या वतीने पक्षश्रेष्टीने संधी दिली तर आपण खुदावाडी पंचायत समिती गणातून निवडणूक लढवून विजय संपादन करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

तर याच खुदावाडी पंचायत समिती गणातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले येडोळा गावचे माजी सरपंच पद्माकर पाटील हे देखील सतत जनतेच्या संपर्कात असतात त्यांनी सुन २०१८ ते २०२३ दरम्यान सरपंच म्हणून काम करत असताना येडोळा गावातील डवरी गोसावी भटक्या विमुक्त समाजातील वंचित लोकांना जवळपास १०० गरजू कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळवून देवून घरकुल योजनेत या ग्रामपंचायतीया राज्यात दुसरा क्रमांक पटकावला त्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून त्यांचा सन्मानही करण्यात आला.

गावात अंतर्गत सिमेंट रस्ते पाणी लाईट गटारीचे कामे आधी विविध विकासकामे राबवून गावाच्या विकासाला गती दिली. महाविकास आघाडी कडून संधी मिळाल्यास आपण खुदावाडी पंचायत समिती गणातील प्रत्येक गावाचा सर्वांगीन विकास करण्याचा प्रयत्न करणार असल्याचा निर्धार केला आहे.

तिकीट कोणाका मिळेना पण या पंचायत समिती गणात महायुती विरुद्ध महाविकारा अघाडी मध्येचं सरळ सरळ लढत होणार असे चित्र आहे.

# प्रगतशील शेतकरी संदीप परांडे यांच्या शेती क्षेत्रातील उल्लेखनीय कामाबद्दल 'टॅलेंट कट्टा महाराष्ट्र'कडून वतीने राज्यस्तरीय सह्याद्री रत्न पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेतीमध्ये नवनवीन तडतडे आणि यांचा वापर करून शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेऊन तरुण शेतकरी यांना आदर्श देण्याचे काम करणारी प्रगतशील शेतकरी संदीप परांडे यांच्या शेती क्षेत्रातील उलथनीय कामाबद्दल टॅलेंट कट्टा महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय सह्याद्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शितल क्षेत्रात सतत नवनवीन प्रयोग करून जास्तीत जास्त उत्पादने घेण्याकडे त्यांचा कल असतो व तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता शेतीमध्ये आधुनिक पद्धतीने उत्पादन घेऊन शेतीकडे व्यवसाय म्हणून पहावे असा संदेश परांडे यांनी दिला.

# पोलीस मित्र सोशल असोसिएशनचा पुरस्कार वितरण सोहळा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनीधी : प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य)या सामाजिक संघटनेच्या वतीने अत्यंत सन्मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केला जातो.यात डॉक्टर, वकील इंजिनिअर, समाजसेवक, शिक्षण, शेती उद्योग इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार दिला जातो. याहीवर्षी डॉ.भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे जवळपास महाराष्ट्र राज्यातील ३९ पुरस्कार्थींना हा पुरस्कार देण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, ॲड. आण्णाराव पाटील (विधीमंडळाचे अध्यक्ष) तसेच लातूर जिल्ह्याचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष घोडके, राजेंद्र बारगुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष सुशिल चिकटे, सिद्धार्थ कवठेकर,प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संयोजक सुफी सय्यद शमशोद्दीन समाजसेवक, उषाताई धावारे, अनिता दोरवे, सुरज मांदळे, संतोष सोनवणे, प्रा महादेव गपाट, बंडु ताटे, गंगासागर ढवळे, संतोष सोनवणे, आकाश कांबळे, सुरेखा घोडके, सहारा शेख, डॉ ख्वाजा शेख, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी दिवाळी स्नेहभोजन ठेवण्यात आले होते,यात मान्यवरांच्या भाषणात खासदार डॉ.काळगे म्हणाले समाजकार्य करणाऱ्यांना पुरस्कार म्हणजे त्याला प्रेरणा देणे आहे, तर अध्यक्षीय भाषणात बोलतांना ड.आण्णाराव पाटील म्हणाले रंजल्या गांजल्यात ज्याला देव दिसतो व जातिभेद ना करता निस्वार्थ भावनेने जो समाजाची सेवा करतो तोच खरा समाजसेवक, आणि हा समाजसेवक मी सुफी सय्यद शमशोद्दीन यांच्या माध्यमातून पाहतोय. या वेळी उद्योग म्हणून विश्वनाथ बळीराम क्षीरसागर यांना उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी बंडू ताटे यांनी आभार मानले.

**नियंत्रण मिळवण्यासाठी घाटकोपर पोलिस गस्त भूमिकेत**

# घाटकोपर स्टेशन परिसरात दिवाळी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी; वाहतूक कोंडी वाढली





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज :

घाटकोपर स्टेशन परिसरात दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली असून, त्यामुळे परिसरातील वाहतूक कोंडी वाढली आहे. विशेषतः घाटकोपर पश्चिमेकडील महात्मा गांधी रोडवर गेल्या आठवड्याभरापासून खरेदीदारांची सततची वर्दळ पाहायला मिळत आहे.

पश्चिमेकडून पूर्वेकडे तसेच स्टेशनमार्गावरून भटवाडी, असल्फा नगर आणि एल. बी. एस. मार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन घाटकोपर पोलिसांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक शरद शेटे , सहायक पोलिस निरीक्षक लालासाहेब डाके व त्यांचे पथक दिवस-रात्र गस्त ठेवत आहेत. विशेषतः सायंकाळी पाचनंतर वाढणारी गर्दी व वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांचे विशेष लक्ष केंद्रित आहे.

दिवाळीचा उत्सव आनंदात आणि शांततेत पार पडावा, तसेच कायदा व सुव्यवस्था राखली जावी यासाठी आम्ही दिवाळी संपेपर्यंत वाहतूक नियंत्रणावर भर देत आहोत, उसळलेल्या गर्दीचा चोर देखील फायदा घेत असतात. नागरिकांनी शक्यतो गर्दीच्या ठिकाणी महागडे दागिने , पैसे यांचा वापर करू नये असे आवाहन देखील आम्ही करत आहोत.. तसेच पोलिसांची गस्त वाढवली असल्याचे पोलिस उप निरीक्षक शरद शेटे यांनी सांगितले.

# विद्यार्थी तणाव मुक्त करू : प्रशांत दामले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दर्यापूर : नुकताच संत लहानुजी महाराज विद्या मंदिर लोतवाडा ता.दर्यापूर जि. अमरावती येथे पिंपळोद येथील हास्य कवी प्रशांत दामले यांचा वऱ्हाळी ठसका समाज प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित केला होता. वेगवेगळ्या कवितांचे सादरी करण विनोदी किस्से सांगून विद्यार्थ्यांचे मनोरंजनातून प्रबोधन झाले, कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्यध्यापिका काळे मॅडम, व सर्व शिक्षक वृंदांच्या उपस्थितीत प्रशांत दामले यांचा कार्यक्रम आनंदात पार पडला..!

# कमला भवानी साखर कारखान्याचा बॉयलर प्रदीपन सोहळा संपन्न

## दीपावलीच्या शुभमुहूर्तावर गाळप हंगामास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कमला भवानी सहकारी साखर कारखाना बॉयलर प्रतिपन कार्यक्रम संपन्न यांनी देखील करमाळा तालुक्यातील कमला भवानी साखर कारखाना एकमेव ऊस उत्पादकाची अशा स्थान असल्याचे सांगून हा कारखाना योग्य मार्गाने चालवलेला असून त्यांच्या गाळप हंगामासाठी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष माणिक (दादा ) पाटील महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रसिंह (बापू) नामगिरी तालुका अध्यक्ष भारत भाऊ अवताडे, माजी सरपंच टाकळीचे डॉक्टर गोरख गुळवे, माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब निळसर, प्रगतशील बागायतदार तात्या मामा सरडे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सोलापूरचे राजेंद्र बारकुंड, वांगी विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन सुजित तात्या बागल निंबोरीचे लोक नियुक्त सरपंच रवी वेळेकर पुढारीचे दैनिक पत्रकार अश्फाक सय्यद, शहाजी बापूजी झिंजाडे डॉक्टर सुभाष शेंद्रे शशिकांत सरडे, समाधान भोंगे , शंकर जाधव तुकाराम शिरसागर, तात्या पाटील, बाप्पा चव्हाण गोरख मस्के संग्राम मस्के, बाप्पा चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

हा संपूर्ण कार्यक्रम पार पाडण्यासाठी कारखान्याचे चेअरमन विक्रम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जनरल मॅनेजर अरविंद चौधरी, डेप्युटी जनरल मॅनेजर रामचंद्र शिरसागर वर्क्स मॅनेजर समाधान गायकवाड, शिप अकाउंट ऑफिसर आनंदराव उबाळे, चीफ केमिस्ट विनोद जाधव मुख्य शेती अधिकारी शांताराम जगदाळे, शेती अधिकारी समाधान पाटील प्रशासकीय अधिकारी राम हरी जगताप स्टोरगी पर सय्यद सिविल इंजिनिअर टोणपे ऊस पुरवठा अधिकारी



सुजित शिंदे सुरक्षा अधिकारी शिवाजी अनारसे इत्यादी अधिकारी कर्मचारी व सर्व कामगार बांधव ऊस उत्पादक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीक्षण घेतले.

कारखान्याची प्रशासकीय अधिकारी राम हरी जगताप यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# दीपावली नरकचतुर्दशी २०२५ निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. आज नरकचतुर्दशी निमित्त पोशाखा-वेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.



श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी १ पदरी, मोत्याची कंठी २ पदरी, नेकलेस,शिरपेच मोठा १० लोलक असलेला, मस्त्य जोड, तोडे जोडे, सूर्य कळ्यांचा हार, सोन्याचे पैंजण जोड, तुळशीची माळ १ पदरी, नक्ष्मी टोप इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवामनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री. राधिका मातेस नक्षी टोप, ठुशी नवीन, मोत्याचा कंठा मोठा, पुतळ्यांची माळ, व ✻ श्री.सत्यभामा मातेस सिध्देश्वर टोप, मोत्याचा कंठा, ठुशी नवीन, पुतळ्यांची माळ, इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पारंपरिक अलंकाराच्या वेशातील मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

# आमदार समाधान आवताडे यांनी मरीआई समाज बांधवाबरोब दीपावली केली साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

मरी आई वाले समाज हा गेल्या कित्येक वर्षापासून वंचित असलेला समाज म्हणून ओळखला जातो व या मर्यायी वाले समाजामधील बांधव अतिशय आला की चे जीवन जगत आहेत हे मर्यायीवाले समाज बांधव गावाबाहेरील उड्या शेतमालावर आपल्या झोपड्या टाकून राहतात रावटी टाकून राहतात ऊन, वारा, थंडी, पाऊस, याची तमा न बघता अशा परिस्थितीमध्ये हे या झोपडी मधून राहतात रावटी मधून राहतात अशा बांधवांना दीपावलीच्या निमित्ताने मंगळा पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यातील खुपसंगी या ठिकाणी राहत असलेल्या मर्यायी वाले समाजातील बांधवांना दीपावलीच्या निमित्ताने साडी कपडे व फराळीचे साहित्य वाटप करून त्या घरी बसलेल्या मर्यायी वाले समाज बांधवांची दीपावली यंदाच्या वर्षी आमदार समाधान आवताडे यांनी गोड केली व मर्यायी वाले समाज बांधवांनी आमदार समाधान आवताडे यांची आभार मानले.

यावेळी मर्यायीवाले समाज तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी काँग्रेस सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी काँग्रेस कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे यांनी केले. निफाड तालुका काँग्रेस कमिटीने आयोजित केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी आढावा बैठक प्रसंगी प्रभारी निरीक्षक सिकंदर शेख त्यांनी प्रत्येक गट व गणातून इच्छुक उमेदवारांची नाव बोलवुन अहवाल सादर करणे विषयी सूचना केल्या. याप्रसंगी निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायक शिंदे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, ओझर येथील कृष्णा सोनवणे, पिंपळगाव शहराध्यक्ष दीपक बनकर, जिल्हा उपाध्यक्ष माधवराव निचित,जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन होळकर, नांदुर्डी येथील दशरथ खापरे,यांनी पक्षाची सद्यस्थितीतील वाटचाल व निवडणुकांविषयी मनोगत व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ईव्हीएम मशीन वर न घेता बॅलेट पेपरवर घेतले गेले पाहिजे याविषयी कार्यकर्त्यांनी एकमत व्यक्त केले. .

याप्रसंगी प्रहार पक्षाचे युवा जिल्हा उपाध्यक्ष जयेश जगताप यांच्यासह केजीएन ग्रुपचे अध्यक्ष सलीम भाई सय्यद, सुकेनेचे ग्रामपंचायत सदस्य समीर पिंजारी यांनीही कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी राजाराम पाटील पानगावणे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

. आढावा बैठकीसाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर चव्हाण, साहेबराव





ढोमसे, भाऊसाहेब शिंदे, राजाभाऊ गांगुर्डे, जाफर पठाण, कांचनराज जाधव, प्रभाकर हुजबंध, बाळासाहेब खालकर, अलीभाई शेख, युवा जिल्हा उपाध्यक्ष जयदीप कुंदे, युवा तालुका उपाध्यक्ष तौसिफ राजे, युवा शहर उपाध्यक्ष अमीन कुरेशी, समीर पिंजारी, दीपक जाधव, समीर मुलाणी, नवनाथ वायकांडे, आसिफ मन्सूरी, राजू पवार, सोपान वाघ उपस्थित होते. आढावा बैठकीचे सूत्रसंचालन काँग्रेसचे सरचिटणीस सुहास सुरळीकर यांनी केले तर शहराध्यक्ष स्वप्निल विनायकिया यांनी आभार मानले. या वेळी काँग्रेस कार्यकर्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पटवर्धन कुरवली येथील शेतकरी प्रशासनाविरोधात बोंबाबोंब आंदोलन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी



पटवर्धन कुरोली येथे गेले काही दिवसापासून तलाठी पूर्ण वेळ उपलब्ध नसल्याने व या गावातील अतिवृष्टीचे नुकसान भरपाईचे काम काज अतिशय धीम्या गतीने चालू आहे मागील काही दिवसापूर्वी पटवर्धन कुरवली येथील तलाठी यांची बदली झाली आहे नवीन कर्मचारी कामावर रुजू झाले परंतु लगेच रजेवर गेले यानंतर दुसऱ्या कर्मचाऱ्यांचे पदभार देण्यात आला याच दरम्यान अतिवृष्टी चे पंचनामे चालू झाले. पहिला कर्मचारी रजेवर गेल्याने दुसरा कर्मचारी त्याच्यामध्ये चार्ज देण्यावरून तात्पुरता वाद झाल्याने गेले पंधरा ते वीस दिवसात तलाठी कार्यालयात जबाबदार कर्मचारी उपलब्ध नाही, सर्कल मॅडम मदतनीस यांनी अतिवृष्टीचे कामकाज पूर्ण करीत आहेत परंतु सह्या करणारा ज्याच्याकडे पदभार आहे तो रजेवर गेलेला कर्मचारी हे दोन्ही कर्मचारी हजर तर नाहीतच पण फोनही उचलत नाहीत त्यामुळे पटवर्धन कुरवली येथील अतिवृष्टी व शाळेचे दाखले बँकेचे कामकाज उत्पन्नाचे दाखले, कामकाज पूर्णपणे बंद आहे. पुढील दोन दिवसात योग्य त्या कार्यकर्त्याची उपलब्धता झाली नाही तर पटवर्धन कुरवली येथील ग्रामस्थ सह स्वाभिमानी शेतकरी संघटना बळीराजा शेतकरी संघटना तंटामुक्त समिती सर्वांच्या वतीने शासनाच्या गलथान कारभाराला जाग आणण्यासाठी बोंबाबोंब आंदोलन करण्यात येईल याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाला राहील. यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली जवळेकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कांतीलाल नाईक नवरे शेतकरी नामदेव खेडकर सुनील नाईक नवरे पोपट टेके, बाळासाहेब शेख इत्यादी जण उपस्थित होते.

# भाळवणी येथील श्री उत्कर्ष वाचनालयाच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील श्री उत्कर्ष वाचनालयाच्या वतीने देशाचे माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त यशश्री अॅक्ढमी येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रणजीत जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच नितीन शिंदे,प्रा. शशिकांत देशपांडे, भीमा पाटबंधारे विभागाच्या अभियंता रूपाली कांबळे, माजी मुख्याध्यापक भीमराव जाधव, युवा उद्योजक सीताराम माने,अंकुश गायकवाड आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रूपाली कांबळे म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी कोणत्याही स्पर्धा परीक्षेत सामोरे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. वाचनात सातत्य ठेवल्यास यश नक्कीच मिळते.



यावेळी उपसरपंच नितीन शिंदे,शशिकांत देशपांडे, भिमराव जाधव, प्रवीण लिंगडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी सरपंच रणजीत जाधव (आदर्श सरपंच) शशिकांत देशपांडे (दानशूर व्यक्ती) रूपाली कांबळे (अभियंता )सिताराम माने ( सचिव बिल्डर्स असोसिएशन)सचिन शिंदे (आदर्श शिक्षक) प्रशांत माळवदे (डॉ. कलाम प्रेरणादायी पुरस्कार)सलीम शेख (एस टी शिवाई चालक निवड) आराध्या गवळी (ज्ञानज्योत टॅलेंट सर्च परीक्षा जिल्ह्यात पहिली,राजकन्या कांबळे जिल्ह्यात चौथी,उपासना सचिन शिंदे राज्यात पहिली)प्रणव लाडे, विजय घाडगे (कुस्ती )गौरी कापसे, अमृता मासाळ (जलतरण )साक्षी सतीश शिंदे (जपान येथील उडी दोर स्पर्धेत यश) आर्या माने ( रयत ओलंपियाड परीक्षा )शिवतेज गायकवाड, उपासना इंगोले,विधी इंगोले,अर्जुन इंगोले (तायक्वांडो कराटे) यांचा शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वाचकांच्याकरिता विविध दिवाळी अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक धन्यकुमार गाजरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत माळवदे यांनी केले.आभार श्रेयस गाजरे यांनी मानले. यावेळी शिक्षक,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## १३९ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा उत्साहात संपन्न

# दर्जेदार शिक्षणातून समाजाने मान्याच्या व मोक्याच्या जागा हस्तगत केल्या पाहिजेत : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन आणि दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने हंटर आयोग, वर्तमानातील नवीन शैक्षणिक धोरण आणि फुले-शाहू-आंबेडकरांचे शैक्षणिक विचार या विषयावर आधारित १३९ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा मैत्रेय ज्ञानतीर्थ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, एन-८, सिडको येथे १९ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडली.

या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक आणि आईना चे नॅशनल कौन्सिल मेंबर बी. बी. मेश्राम यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात बी. बी. मेश्राम म्हणाले की, महात्मा फुल्यांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर आयोगाला दिलेल्या निवेदनाद्वारे शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याचा प्रयत्न केला. सक्तीचे व दर्जेदार शिक्षण समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचावे, ही त्यांची भूमीका होती. मात्र ब्रिटिशांनी तो विचार नाकारला. आजच्या काळात आपण दर्जेदार उच्च शिक्षणाच्या माध्यमातून मा-याच्या व मोक्याच्या जागा हस्तगत करून समाजाला न्याय द्यायला हवा.

ते पुढे म्हणाले की, उच्चशिक्षितांनी संघटित होऊन समाजाच्या हक्क-अधिकारांसाठी लढा द्यावा, हीच काळाची गरज आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभिजीत धनेगावकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, फुले-दांपत्याने शिक्षण क्षेत्रात केलेल्या क्रांतिकारी कार्यामुळेच आपण आज बोलू शकतो. नवतरुणांमध्ये या विचारांची पेरणी झाली पाहिजे.

मुख्य वक्ते म्हणून उपस्थित त्रिपुरा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश करमाडकर यांनी सांगितले की, नवीन शैक्षणिक धोरणात पदवी शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. विद्यार्थ्यांनी विशेष कौशल्य आत्मसात करून जागतिक स्तरावर स्पर्धा करावी तसेच उद्योजकतेकडेही वळले पाहिजे.

या प्रसंगी अंबादास रगडे, सुधाकर बानाटे, शशिकांत काळे, जी. एस. दोडवे, विलास कटारे, कृष्णा ऐवळे, सी. एम. रमणे, इंजी. बी. बी. रनयेवले यांनीही आपले विचार मांडले.

सुधाकर बानाटे यांनी संस्थांमधील अजूनही जाणवणाऱ्या जातीय भेदभावावर भाष्य केले, तर शशिकांत काळे यांनी बुद्धांच्या तत्त्वांप्रमाणे आचरण करण्याची गरज यावर भर दिला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून झाली. स्मृतिशेष डॉ. सी. पी. थोरात यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्योजक मिलिंद बागुल यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. रमेशचंद्र धनेगावकर यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, सुधाकर बानाटे, डॉ. अभिजीत धनेगावकर, डॉ. रमेश धनेगावकर, डॉ. प्रकाश करमाडकर, शशिकांत काळे, मिलिंद बागुल, विलास कटारे, इंजि. बी. बी. रनयेवले, जी. एस. दोडवे, अंबादास रगडे, रमेश मगरे, कृष्णा ऐवळे, सी. एम. रमणे आदी मान्यवर उपस्थित होते.